दि.०१/०८/२०२२.        प्रकरण क्रं.  :— १२०/पीडब्ल्यू/२०२०

निशाणी क्रं.  :— २१

साक्षीदार क्रं.  :— ३
माझे नाव  :— दत्तू गंगाराम गिते.
वय  :— ६१ वर्षे. कामधंदा :— सेवानिवृत्त पो.ऊ.नि.
सध्या राहणारा  :— नाशिक.

सरतपास स. स. अभियोक्ता श्रीमती शेख नाजिया नुरूल अमीन यांच्या मार्फत

सरकारी वकिलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर आढळून आले. सबब साक्षीदाराची साक्ष त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

दि.०९/१२/२०१८ रोजी, मी बांद्रा लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे गुन्हे प्रकटीकरण शाखेमध्ये, पोलीस ऊप निरिक्षक म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी माझी रात्रपाळीची डयुटी होती. त्या दिवशी फिर्यादी बरकद रेहमद अली याने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद क्रमांक ३०६८/२०१८ भारतीय दंड विधान कलम ३५६, ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यादिवशी ठाणे अंमलदार म्हणून श्री बने १५९ पोलीस हवालदार हे कार्यरत होते. त्यांनी फिर्यादीची फिर्याद नोंदवून घेतली होती. त्यानंतर वरिष्ठांच्या तोंडी आदेशान्वये सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. माझ्याकडे तपास दिला त्यावेळेस फिर्यादीने दिलेली फिर्याद दिली होती. सदर फिर्यादचे अवलोकन केले.

२. त्यानंतर श्री माने ३५६० पोलीस शिपाई, यांनी आरोपीला पकडून माझ्या ताब्यात दिले. त्यानंतर मी नासीर व सुरेश वांद्रे या दोन पंचाना बोलावून आरोपीची अंगझडती घेतली. सदर अंगझडतीमध्ये आरोपीच्या पॅण्टच्या उजव्या खिशात हिरव्या रंगाचा

मोबाईल फोन मिळून आला होता. आता मला सदर अंगझडती पंचनामा दाखविला. त्यावर माझी, आरोपीची व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. तो (नि. क्र.१७) वर आहे.

३. त्यानंतर आरोपीला अटक केली. जप्त मोबाईल फोन पोलीस स्टेशनमध्ये जमा करून त्याबाबतची मुददेमाल पावती फाडली. आता मला सदरची मुददेमाल पावती दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्याला (नि. क्र.२२) देण्यात येत आहे. त्यानंतर तपास पूर्ण करून आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. तपासामध्ये आरोपीने मोबाईल फोन चोरी केल्याचे निष्पन्न झाले होते. मी आरोपीला ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. सदरचा मोबाईल फोन न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीला परत दिला आहे.

सरतपास संपला.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री हरिष व्होरा यांच्यामार्फत

४. ज्या वेळेला पोलीस शिपाई माने यांनी आरोपीला माझ्या समक्ष हजर केले त्या वेळेला मी पोलीस स्टेशनमध्ये होतो, हे म्हणने खरे आहे. श्री माने पोलीस शिपाई यांनी आरोपीला कुठून व कसे आणले होते, या बाबत मला वैयक्तिक माहिती नाही, हे म्हणने खरे आहे.

५. सुरेश दगडू वांद्रे याची बांद्रा रेल्वे पोलीस स्टेशनच्या बाहेर, चहाची टपरी आहे, हे म्हणने खरे आहे. सन २०१८ ते २०२० या कालावधीत मी बांद्रा पोलीस स्टेशन, गुन्हे प्रकटीकरण शाखेमध्ये कार्यरत होतो. सुरेश दगडू वांद्रे हा रात्री ०९.३० वाजता त्याची चहाची टपरी बंद करतो. सुरेश दगडू वांद्रे हा बांद्रा वस्तीमध्ये

दि.०१/०८/२०२२. प्रकरण क्रं. :— १२०/पीडब्ल्यू/२०२०
स. सा. क्र.३. निशाणी क्रं. :— २१ पुढे

पटेल नगरी, बांद्रा—पश्चिम येथे राहतो, हे म्हणने खरे आहे. बांद्रा पोलीस स्टेशनपासून पटेल नगरी दहा मिनिटांच्या अंतरावर आहे. पंचनाम्यासाठी मी सुरेश दगडू वांद्रे याला त्याच्या घरून बोलावून घेतले होते. पंच सुरेश वांद्रे व नासीर या दोघांना बोलाविण्यासाठी पोलीस शिपाई माने हे गेले होते.

६. सदरच्या दोन्ही पंच साक्षीदारांनी बांद्रा पोलीस स्टेशनच्या बऱ्याचशा केसेसमध्ये पंच म्हणून सहया केलेल्या आहेत, हे म्हणने खरे आहे. बऱ्याचशा केससेमध्ये मध्ये मी तपासी अंमलदार म्हणून काम केलेले आहे. पंचनाम्यानूसार मुददेमाल जप्त केल्यानंतर तो लाखेने सील करावा लागतो, हे मला माहित आहे. सदर गुन्ह्यातील मुददेमाल जप्त केल्यानंतर तो लाखेने सील केला नव्हता. सदर प्रकरणात मी सीसी टिव्ही फुटेज दाखल केलेले नाही.

७. आरोपीकडून कोणताही मोबाईल फोन जप्त केला नव्हता, हे म्हणने खरे नाही. वरिष्ठांना कामगिरी दाखविण्याकामी सदरचा मोबाईल फोन हा आरोपीकडून जप्त केल्याचे दाखविले, हे म्हणने खरे नाही. मी खोटा पंचनामा तयार केला व आरोपी विरूध्द खोटे दोषारोप पत्र दाखल केले, हे म्हणने खरे नाही.

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

दि. ०१/०८/२०२२.
सराद.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
स्वाक्षरी/—
(भा. कि. गावंडे)
महानगर दंडाधिकारी, ३६वे न्यायालय,
मुंबई सेंट्रल, मुंबई.